पोलीस कोठडीत आरोपींची देखभाल व मृत्यू पावलेल्या कैद्यांची प्रकरणे हाताळण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग,
परिपत्रक क्रमांक एमयूआर ०१९०/सीआर-१५८/पोल-११,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २२ नोव्हेंबर १९९०.

## प रि प त्र क

पोलीस कोठडीतील/पोलिसांच्या ताब्यातील आरोपींची देखभाल व मृत्यू पावलेल्या कैद्यांची प्रकरणे हाताळण्याबाबत आतापर्यन्त शासनाने व पोलीस महासंचालकांनी बरेच आदेश निर्गमित केले आहेत. हे सर्व आदेश एकत्रित करून व काही ठिकाणी दुरूस्ती करून यापुढे खाली दर्शविल्याप्रमाणे कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी असे शासनाचे आदेश आहेत.

१. आरोपीस पोलीस कोठडीत दाखल केल्यानंतर -

[१] पोलीस कोठडीत आरोपीस ठेवण्यापूर्वी ज्यावेळी पहिल्यांदा कोठडीत ठेवण्यासाठी आणले जाईल, त्यावेळी कैद्यांच्या अंगावरील दुखापतींची नोंद ठेवण्यात यावी. तसेच तशी नोंद स्टेशन डायरीत घेण्यात यावी. तसेच आरोपीस तपासात बाहेर काढण्याची व परत आत ठेवल्याची नोंद स्टेशन डायरीत घेण्यात यावी.

[२] प्रत्येक २४ तासानंतर पहारा पथक संपूर्णपणे बदलण्यात यावा.

[३] गार्डला प्रवेशव्दाराजवळ स्थितीशील ड्युटी देण्यात यावी, जेणेकरून तो त्या कोठडीवर संपूर्ण नजर ठेवू शकेल.

[४] गार्ड ड्युटी दोन तासांनी परिभ्रमीत ठेवावी.

[५] आरोपीस कोठडीबाहेर नैसर्गिक विधी वगैरेसाठी बाहेर काढण्यात आल्यास पुरेसे संरक्षण देण्यात यावे.

[६] आरोपीला कोठडीत कोणत्या कक्षेत ठेवण्यात आले आहे, त्याची नोंद घेण्यात यावी.

[७] आरोपीला एका कोठडीतून दुस-या कक्षेत हलविल्यानंतर नोंद वहीत नोंद घेण्यात यावी.

[८] आरोपीला कोठडीत ठेवण्याबाबतचे आदेश सहाय्यक पोलीस निरीक्षकांनी स्वतः द्यावेत.

जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक
DEC 1990
शाखा -
उ.जि. नि. क.प. जिल्हाधिकारी

[९] आरोपीस कोठडीबाहेर छन्न मार्गात ठेवण्यात येऊ नये.

[१०] पोलीस कोठडीत असलेल्या आरोपी कैद्यांना मारहाण करू नये.

२. आरोपीच्या पोलीस कोठडीतील मृत्यूनंतर -

[१] पोलीस कोठडीत मृत्यू झाल्यानंतर ठाणे अंमलदारांनी तात्काळ जिल्हा दंडाधिका-यांना व स्थानिक कार्यकारी दंडाधिका-यांना, पोलीस अधिक्षक/पोलीस उपायुक्त यांना त्याची माहिती द्यावी.

[२] इन्क्वेस्ट पंचनामा कार्यकारी दंडाधिकारी म्हणून तहसिलदार यांनी स्वत: करावा. जेथे शक्य नसेल त्या ठिकाणी त्याची कारणे जिल्हा दंडाधिका-यांनी आपल्या [परिच्छेद-८] अहवालात उल्लेख करावा. पंचनामा करतेवेळी मयताचे जवळचे नातेवाईकांना सहभागी करुन घेण्यात यावे.

[३] पंचनामा पूर्ण झाल्यानंतर, पंचनाम्याच्या कमीत कमी ४ प्रती करण्यात याव्यात व पंचनामा पूर्ण झाल्यावर त्याची एक प्रत मयताच्या नातेवाईकास कार्यकारी दंडाधिकारी यांनी द्यावी व प्रत मिळाल्याबद्दल तशी स्वाक्षरी घ्यावी.

[४] तपासाची सर्व कागदपत्रे तात्काळ जिल्हयाच्या स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या प्रमुखाकडे सोपविण्यात यावीत. व त्याचा उल्लेख पोलीस अधिका-यांनी आपल्या अहवालात [परि. १ प्रमाणे] करावा, जेणेकरुन स्थानिक पोलीस अंमलदारांना कागदपत्रात खाडाखोड करणे अथवा गुन्हयाच्या तपासात ढवळाढवळ करणे शक्य होणार नाही.

[५] प्रेत शवविच्छेदनासाठी तात्काळ पाठवावे. पोलीस अधिक्षक/पोलीस उपायुक्त यांनी वैयक्तिक चौकशीसाठी तात्काळ घटनास्थळास भेट द्यावी व त्यांचा अहवाल जिल्हा दंडाधिकारी/पोलीस आयुक्त/पोलीस महासंचालक यांना पाठवावा.

[६] मृतकाची उत्तरीय तपासणी दोन वैद्यकीय अधिका-यांनी करावी.

[७] पोलीस कोठडीत झालेल्या मृत्यूच्या संदर्भात २४ तासाच्या आत गृह विभागास जिल्हा दंडाधिका-यांनी प्राथमिक अहवाल पाठविणे आवश्यक आहे. त्यात खालील गोष्टींचा समावेश असावा.

१] आरोपीचे नाव,
२] आरोपीस अटक करण्याचे कारण,
३] आरोपीच्या मृत्यूची परिस्थिती.

[८] त्यानंतर जिल्हा दंडाधिका-यांनी गृह विभागास तपशीलवार अहवाल

विनाविलंब पाठविणे आवश्यक आहे. सदर अहवालात खालील गोष्टींची माहिती असावी.

१] आरोपीचे वय,
२] आरोपीस अटक केल्यावेळी त्याची प्रकृती,
३] आरोपीच्या अंगावरील जखमा,
४] आरोपीच्या मृत्यूच्या कारणाबाबतचा वैधकीय अहवाल,
५] आरोपीस कोणत्या गुन्ह्यासाठी व कोणत्या कलमाखाली अटक केली होती,
६] पोलीस ठाण्याचे नाव,
७] गुन्ह्याचा रजिस्टर क्रमांक,
८] आरोपीस अटक केलेल्या अधिका-याचे नाव व हुद्दा व नेमणूक,
९] इतर माहिती.

[९] राज्य गुन्हा अन्वेषण विभागाने/मुंबई शहर गुन्हा अन्वेषण विभागाने अशा प्रकरणात ३ महिन्याचे आत चौकशी पूर्ण करावी. सदर चौकशी मुदतीत पूर्ण करणे शक्य न झाल्यास विलंबाची कारणे चौकशी अहवालात नमूद करावीत.

[१०] आरोपी पोलिसांच्या ताब्यात असताना घडणा-या मृत्यूची मुंबई शहराव्यतिरिक्त राज्यातील सर्व प्रकरणे राज्य गुन्हा अन्वेषण विभागाकडे चौकशीसाठी सोपवावीत.

मुंबई शहरात दाखल होणा-या प्रत्येक अपघाती मृत्यू प्रकरणामध्ये [पोलीस कोठडीतील झालेल्या मृत्यूसहीत] कॉरोनर ॲक्ट, १८७१ कलम-९ अन्वये कॉरोनरकडून चौकशी केली जाते. म्हणून मुंबईतील अपघाती मृत्यूबाबत दंडाधिकारीय चौकशीची आवश्यकता नाही. मात्र अशा प्रकरणी स्थानिक पोलीस ठाण्यानी चौकशी करण्याऐवजी मुंबई शहर गुन्हा अन्वेषण विभागाने अशा सर्व प्रकरणात चौकशी करावी.

आरोपीच्या मृत्यूपूर्वी घेण्यात येणा-या दक्षतेबाबत आखून दिलेल्या कार्यपध्दतीचे उल्लंघन केल्याचे आढळून/सिध्द झाल्यास ज्या अधिका-यांच्या हातून हे उल्लंघन झाले असेल त्यांच्या अभिलेखात तसे प्रतिवेदन अधिका-यांनी नमूद करावे व ज्या अधिका-यांच्या हातून त्रुटी घडल्या असतील त्यांचेविरूध्द योग्य भासल्यास शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

कृपया वरील शासन आदेश सर्व संबंधितांना कळवून त्याची काटेकोर अंमलबजावणी करावी अशी विनंती.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

अमिताभ राजन,
उप सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन.

प्रति

पोलीस महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
सर्व पोलीस आयुक्त,
सर्व पोलीस उप महानिरीक्षक,
सर्व जिल्हा दंडाधिकारी,
सर्व पोलीस अधिक्षक,
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक,
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल,
सर्व प्राचार्य, प्रादेशिक पोलीस प्रशिक्षण शाळा,
कारागृह महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
सार्वजनिक आरोग्य विभाग.

[illegible] १४.१२.९० पाठविले
कार्यवाही लिपिक

नं. डीसी/पीओएल/I/१८१
जिल्हा दंडाधिकारी रत्नागिरी यांचे कार्यालय
दि. 10. 12. 1990.

प्रत सर्व कार्यकारी दंडाधिकारी/सर्व उपविभागीय दंडाधिकारी यांजकडे माहितीसाठी -

अपर जिल्हा दंडाधिकारी,
रत्नागिरी

10/12/90.